Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका

**अमोल पांडूरंग गहीरे**
संशोधक

**प्रस्तावना:-**

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका तसे पाहायला गेले तर त्यांना Symbol Of Knowledge म्हणून संपूर्ण जगभर ओळखले जाते. त्यांच्या कार्याविषयी लिहित असतांना शब्दही अपूरे पडतील असे कार्यकर्तृत्व डॉ.बाबासाहेबांचे आहे. एखादा देश सक्षमपणे उभा करण्यासाठी काय आवश्यक असते.? देशाला विकासात अग्रेसर करायचे असेल तर कशाची गरज आहे.? देशाचा सर्वसामान्य नागरिकांना देशाविषयी अभिमान वाटावा त्यांना सुरक्षित वाटावे यासाठी कशाची गरज असते.? या सर्व प्रश्नाचे उत्तर आहे कायदा व सुव्यवस्था,शांतता आणि सुरक्षितता जी आपली राज्यघटना आपणाला बहाल करते. ज्या राज्यघटनेच्या जोरावर आपण गेली पंच्चाहत्तर वर्ष आपल्या देशाला विकसनशील देशांच्या यादीत येण्यासाठी यशस्वीपणे जगातील सगळ्यात मोठी लोकशाही शासन व्यवस्था राबवत आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या घटना समितीचे सभासद होते. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला आणि भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत सिंहाचा वाटा उचलला म्हणूनच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा शब्दात त्यांचा उचित गौरव केला जातो. तसेच हे उद्गार स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी काढले होते. ते स्वत: घटना समितीचे अध्यक्ष होते म्हणून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घटनेचे शिल्पकार म्हणतात.

आधुनिक भारताच्या जडघडणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान पाहणे अत्यंत गरजेचे आहे आज आपण स्वतंत्र भारतात मोठ मोठ्या योजना आखत आहोत. आपणास कोट्यावधी परकीय गुंतवणूक आकर्षित करत आहेत ते आपल्याला शक्य झाले ते आपल्या राजकीय स्थैर्या मुळे राजकीय स्थैर्य आपल्याला राज्यघटनेमुळे मिळाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या रुपाने आधुनिक भारताचा पाया घातला होता.त्याचे मूर्त रुप आपण आज एकविसाव्या शतकात पाहात आहोत. आज जागतिक स्तरावर ही एक सक्षम,विकसनशील देश म्हणून पाहिले जात आहे हे अमेरिका ही मान्य करत आहे. या पाठिमागे आपण स्वीकारलेली राज्यघटना संसदीय लोकशाही शासन पध्दती आहे.

अगदी पूर्वीपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या जडणघडणीत अप्रत्यक्षपणे योगदान देत आलेले आहेत. इंग्रज सरकारमध्ये प्रथम जूलै १९४१ मध्ये भारताच्या संरक्षण सल्लागार समितीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती केली होती.मित्र राष्ट्राकडून दुस-या महायुध्दात महार बटालियन ने सहभागी व्हावे असे आव्हान त्यांनी कोकणातील महार बटालियनला केले होते. त्यामध्ये त्यांचा मुत्सदीपणा दिसून येतो.त्यांचा हिटलर आणि मुसोलिनीच्या हुकूमशाही प्रवृत्तीला तत्वत: विरोध होता १९४२ दरम्यान मजूर मंत्री म्हणून डॉ.बाबासाहेब यांनी काम पाहिले याच दरम्यान त्यांनी व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात राहून उघडपणे आणि गुप्तपणे अस्पृश्यांच्या आणि मजूरांच्या हिताची जेवढी कामे करता येतील तेवढी कामे त्यांनी केली. उदा. कामाचे तास १२ वरून ०८ तास करणे,कामगार सुधार योजना,कामगार कल्याण योजना आदि कल्याणकारी निर्णय त्यांनी घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्री असतांना अस्पृश्यांच्या मुलांसाठी तसेच उच्च शिक्षण घेणा-या मुलांसाठी फॉरेन स्कॉलरशीप प्रपोजल मंजूर करुन घेतले होते तसेच त्यांनी पुरुष आणि स्त्री कामगार वर्गासाठी वेगवेगळ्या सवलती मंजूर केल्या होत्या. त्यातील एक म्हणजे प्रसूती काळात स्त्री कामगारांना पगारी रजा देण्याची योजना आहे ती आजतागायत सर्व क्षेत्रात सुरु आहे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बांधकाम खात्याचे मंत्री असताना त्या काळात अनेक विमानतळे बांधून तयार झाली होती त्यांच्या कामाचा व्याप पाहून सेनापतीने ही त्यांच्या कार्यक्षमते विषयी आश्चर्य व्यक्त केले होते. अमरिकन कॉन्सिलची संपर्क साधून दामोधर व्हॅली प्रकल्पाची योजना यशस्वीपणे कार्यान्वित करणे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धरण बांधकामा विषयी उपलब्ध असलेले सर्व ग्रंथ आपल्या खात्या मार्फत मिळविले तसेच त्यांचा सखोल अभ्यास करुन धरणप्रकल्पावरील साहित्य, नकाशे,इत्यादी मागून घेतले त्यांनी सर्व कुशल अभियंताची बैठक घेऊन त्यांच्या समोर तासभर भाषण केले धरणाची रचना, धरणाचे सर्व प्रकार,धरण भूप्रदेशाची आणि मातीची तपासणी,प्रवाह,धरण,जल संचय,इत्यादी सर्व माहिती दिली ते ऐकूण सर्व अभियंते थक्क झाले. हे सर्व डॉ.बाबासाहेबांनी आधुनिक भारतातील सर्वात मोठा प्रकल्प उभारताना घेतलेले कष्टच आहेत त्यांना माहित होते की, यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळणार आहे व असे अनेक प्रकल्प भविष्यात देशात तयार होणार आहेत. त्यासाठी त्यांनी नदीजोड प्रकल्प राबविण्याचे ठरवून उत्तर भारतातील मोठी नदी,दक्षिण भारतातील नदीला जोडण्याचे निश्चित केले होते.१९४६ च्या कॉंग्रेसच्या काळजीवाहू सरकारमध्ये मंत्री म्हणून ते राहिले नाहीत त्यामुळे तो प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही तो प्रकल्प पूर्ण झाला असता तर आपल्याला आज पाण्याचा दुष्काळास सामोरे जाण्याची गरज नसती. आणि उत्तर भारतातील महापूराची समस्या काही प्रमाणात कमी झाली असती. अशा प्रकारचा दुरदर्शीपणा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे होता.

**पाणी अभावामुळे अधिक त्रास :-**

भारतात १९४२ पूर्वीच्या जलधोरणात अतिरिक्त पाणी हीच मुख्य समस्या म्हणून विचारात घेण्यात आली होती. त्यामध्ये सुचविलेल्या उपाययोजना केवळ पूरनियंत्रण या एकाच बाबीचा विचार करणारी होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले की,भारतीय लोक अतिरिक्त पाण्यापेक्षा, त्याच्या अभावामुळे अधिक त्रास सहन करीत आहेत. जल ही संपत्ती असल्याने तिचे वाटप करण्याचे सर्वकष आणि सर्वसमावेषक धोरण असले पाहिजे. नदीकिनारे बंदिस्त करण्याच्या संदर्भात त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन आणि संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो.या संदर्भात विकसित देशांनी स्वीकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे तसेच त्याचा बहुउध्देशीय वापर करणे. धरणे बांधून पाण्याचा वापर सिंचनाशिवाय विद्यूतनिर्मिती व नौकायानासाठी (जल वाहतूक) होऊ शकतो.

**ऊर्जा शक्तीला चालना :-** १९४२ साली व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची श्रममंत्री म्हणून नियुक्ती झाली या शिवाय जल आणि ऊर्जा विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या कालखंडात भारतातील व्यवस्थापन तसेच ऊर्जा निर्मिती संदर्भात दिशादर्शक आणि धोरणात्मक निर्णय घेतले. केंद्रीय वीज प्राधिकरणाची स्थापना नोव्हेंबर १९४४ मध्ये करण्यात आली. या प्राधिकरणा मार्फत देशाचे वीज धोरण निश्चित केले जाते.

**विद्युत विकास** - पुनर्रचना समितीच्या अंतर्गत असणारी धोरण समिती म्हणजेच विद्युत विकासाठीची अधिकृत समिती होती. या धोरण समितीची स्थापना सप्टेंबर १९४३ साली झाली. १९४३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर या समितीचे अध्यक्ष होते. त्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी व त्यांच्या श्रम खात्याने वीज निर्मितीच्या प्रश्नाचा सखोल अभ्यास केला. विजेची निर्मिती उत्पादन व पुरवठा या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महत्वाची व सक्रीय भूमिका मांडली. या समितीच्या २५ ऑक्टोबर १९४३ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणााले वीज निर्मिती वितरण आणि व्यवस्थापन या संदर्भातील प्रश्नांचा अभ्यास करणे आणि भविष्यकालिन धोरणा संदर्भात केंद्र सरकारला मार्गदर्शन करणे ही समितीची प्राथमिक उदिष्ट्ये आहेत.

वीज खाजगी असावी की सरकारी,वीज खाजगी असल्यास सार्वजनिक हितांसाठी कोणत्या अटी घालाव्या वीज विकाासाची व वितरणाची जबाबदारी केंद्राची असावी की राज्याची यासह या समितीने मार्गदर्शन करावे. या समितीत झालेल्या चर्चेच्या आधारे श्रम खात्याने अंतिम मसूदा तयार केला. त्या नूसार अखिल भारतीय स्तरावर

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला. प्रांतीय सरकारांशी चर्चा करुन भारत सरकारने ०८ नोव्हेंबर १९४४ रोजी केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळाची स्थापना केली.

धोरण समितीच्या ०२ फेब्रुवारी १९४५ रोजी झालेल्या दुस-या बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, अशा प्रकारे उच्चस्तरीय मंडळ स्थापन करुन केंद्र सरकार हे मंडळास प्रबळ अशी तांत्रिक संघटना बनवण्यास किती महत्व देते हे स्पष्ट होते. या मंडळाकडून वीज निर्मिती व विकासाच्या विविध योजना राज्य व प्रांतिक सरकारच्या सहाय्याने निश्चित केल्या जातील. तसेच माहिती,संकलन,सर्वेक्षण करणे नव्या संकल्पना राबविणे हे कार्यदेखिल मंडळाचे असेल. या मंडळाचे मुख्य उदिष्ट्ये म्हणजे सार्वजनिक विजपुरवठ्याची योजना राष्ट्रीय स्तरावर सर्वांनी स्वीकारावी यासाठी केंद्र सरकार,राज्य सरकार,प्रांतीय सरकारे यांना मार्गदर्शन करण्याचे आहे.हे मंडळ विद्यूत विकासासाठी आवश्यक ती पाहणी करणे,माहिती संकलित करणे व राज्य आणि प्रांतिक सरकारांच्या साहाय्याने वीज विकासांच्या योजना तयार करणे यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहे. सध्या जे केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण आहे त्याची सुरवात १९४४ साली स्थापन झालेल्या केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळातून झाली याची अनेकांना कल्पना नसेल. कारण,नंतरच्या काळात या मंडळाच्या नावात व संघटनात्मक रचनेत वारंवार बदल झाले.

गरीब व मागास जनतेचे कल्याण हाच प्रमुख उेश समोर ठेवून डॉ.बाबासाइेब आंबेडकर यांनी विद्यूत आणि जल क्षेत्राच्या विकासासंदर्भात दूरदृष्टीची मते मांडली. त्यांच्या मताची भारताच्या जल आणि विद्यूत धोरणावर मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेमध्ये ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे ज्यावर आपल्या देशाची आर्थिक घडी अवलंबून आहे. आपल्या देशाचा आर्थिक कणा म्हणजे भारतीय रिझर्व बँकेची ०१एप्रिल १९३५ रोजी स्थापना झाली. या मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे.

भारत पाकिस्तान फाळणी पूर्वी जे भाषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ डिसेंबर १९४६ च्या बैठकीत बॅरिस्टर जयकरांच्या मताला पृष्टी देणारे आणि अखंड भारताविषयी आपले आदर्श राष्ट्र प्रेम व्यक्त करणारे अत्यंत महत्वाचे भाषण केले. अर्थात ते भाषण इंग्रजीमधून होते. ते म्हणतात. Now sir I have got not the slightest doubt in my minds as to the future evolution and ultimate shape off the social political and economic structure of this great country. I know today we are group of warring campus and I may go even to the extent of conferring that,I am probably one of the leaders of such a camp; but sir with all this, I am quite convinced that given time circumstances nothing in this world will prevent this country from becoming one. All our castes and creed,I have no the slightest hesitation that we shall in some from bean United people (पृष्ठ क्रमांक २१९-२२० डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड९- चांगदेव खैरमोड)

याचा अर्थ असा की डॉ.बाबासाहेबांनी त्या काळात असा आशावाद व्यक्त केला की आज जरी आपण आपआपसात जातीच्या धर्माच्या नावावर युध्द छावण्या तयार केल्या असल्या तरीही भविष्यात आपण सर्व एक होऊन एक देश म्हणून तयार होण्यासाठी जगातील कोणतीही शक्ती आपणास रोखू शकत नाही. आपल्यातील सर्व हेवेदावे जाती,धर्म कर्मकांड सोडून आपण एक संघ लोक होऊ असे त्यांनी त्या काळात ठणकावून सांगितले होते. यावरुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची देशभावना व्यक्त होते व भविष्यातील भारता विषयीचे स्वप्नही सर्वच क्षेत्रात डॉ.बाबासाहेबांनी आधुनिक भारताच्या जडणघडणीत मोठे योगदान दिले आहे. राज्यघटनेने कायदा व सुव्यवस्थेसाठी बांधकाम क्षेत्रात,अस्पृश्यता निवारण व त्यांचा उध्दार,स्त्रियांच्या शिक्षण व समान अधिकारांच्या क्षेत्रात तसेच केंद्रीय कायदामंत्री या नात्याने त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हिंदू कोड बील तयार केले पंडित नेहरू यांनी देखील या बिलाची प्रशंसा केली होती. हिंदू धर्म व हिंदू समाज यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा तो अखेरचा प्रयत्न होता; परंतू त्यांच्या या महान क्रांतीकार्याला कॉंग्रेसमधील प्रतिगामी गटाने विरोध केला. हा विरोध पाहून पंडित नेहरु यांनी माघार घेतली त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. पण आज त्यातील ब-याच कलमांचे कायद्यात रुपांतर झाले आहे. त्यामध्ये महिलांसाठीचे आरक्षण,सामाजिक सुरक्षितता,वारसाहक्क इत्यादी.

सन १९४६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना केली. तिच्या वतीने मुंबईत २० जून १९४६ ला सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना तसेच मराठवाड्यातील औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेजची स्थापना करुन इतर शैक्षणिक संस्थानची स्थापना केली. पीपल्य एज्युकेशन सोसायटीने दलित विद्यार्थ्यांसाठी काही वसतिगृहेही चालविली. डॉ.बाबासाहेबांनी समाजाच्या उध्दारासाठी जे कार्य केले त्यास इतिहासात तोड नाही. आपल्या अस्पृश्य बांधवांना संघटित करुन त्यांना अन्यायाविरुध्द संघर्ष करण्यास व न्याय हक्कांसाठी झगडण्यास त्यांनी तयार केले. अशा प्रकारे त्यांनी दलितांमधील अस्मिता जागृत केली. त्याचबरोबर दलितांना मुख्य राष्ट्रीय प्रवाहाशी जोडून आणि भारताची राज्यघटना तयार करुन आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अमूल्य व भरीव आहेच ते कोणी नाकारु शकत नाही पण त्यांचे वारसदार म्हणून आपण काय करत आहोत हा ही प्रश्न यावेळी आपल्यातील प्रत्येकाने स्वत:ला विचारला पाहिजे.? एक आदर्श मुलगा,आदर्श अर्थशास्त्रज्ञ,आदर्श नेता,आदर्श विद्यार्थी, आदर्श राष्ट्रभक्त देश प्रेमी,प्रज्ञासुर्य, अभ्यासू मानवंशशास्त्रज्ञ,राज्यशास्त्राचे गाढे अभ्यास,उत्कृष्ठ वकृत्व शैलीचे धनी जगातील विविध भाषा अवगत असलेले व्यक्तीमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या तसेच जगाच्या इतिहासात अव्दितीय व अजरामर असे स्थान आहे. मानवी जीवनाच्या अनंत पैलूचे त्यांनी निरीक्षण केले आहे. त्यांच्या कार्यकतृत्वाने ते अनेकांचे प्रेरणास्थान बनले आहे. शिक्षणाचे प्रेरणास्तंभ,भारतीय संविधानाचे शिल्पकार,ज्ञानपुरुष.निस्सीम ग्रंथप्रेमी, विचार स्वातंत्र्याचे खरे समर्थक, थोर समाज सुधारक,प्रख्यात अर्थतज्ञ,आंतरराष्ट्रीय संबंधाचे माहितीगार, ऊर्जा व जलसंसाधनाचे नियोजक,अंधश्रध्देचे कर्दनकाळ, महिलांच्या समान हक्कासाठी संघर्षरत भारतीय समाजव्यवस्थेने वंचित असलेल्या, मुके बनलेल्या समाजाला त्यांनी प्रेरक उर्जा दिली.तसेच त्यांना मुख्य प्रवाहात आणले आणि संघर्षाची जाणीव करुन दिली म्हणून ते दबलेल्या वंचित बहुजन समाजाचे मूकनायक ठरले आहे.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत आणि सामाजिक न्यायाच्या लढाईत त्यांनी आपले मत आर्थिक दृष्टीकोनातून मांडले आहे. दुर्दैवाने त्यांचा हा दृष्टीकोन दुर्लक्षित राहिला आहे.गोरगरिब, शेतमजूर, भूमीहीन, अल्पभूधारक, शोषित, पीडीत आणि भारतीय समाजाने नाकारलेल्या वंचित समाजाचे दु:ख वेदना त्यांनी जवळून पाहिल्या व भोगल्या सुध्दा हाल अपेष्टा सहन करीत संघर्ष केला त्यामुळे त्यांना द्रारिद्र्याची जाणीव होती. सामाजिक आर्थिक व दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकलेल्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असा त्यांचा ठाम विश्वास होता.सहा सात दशकापूर्वी देशातील अधिकांश जनता ही सामाजिक व आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे मागासलेली होती. बहुसंख्य जनता विशेषत: ग्रामीण भागातील जनता ही पूर्णपणे शेतीवर अवलंबून होती.राष्ट्रीय उत्पन्नातही अन्य क्षेत्रापेक्षा कृषी क्षेत्राचा वाटा अधिक होता. म्हणूनच शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाते.

**संदर्भ:**

१. आंबेडकरी चळवळ, य.दी.फडके
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग स्पीचेस
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ-महाराष्ट्र शासन प्रकाशित २००२
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-१
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार चळवळ-संपादक प्रदिप गायकवाड
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक चिंतन-डॉ. नरेंद्र जाधव